Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ५] मंगळवार, ऑक्टोबर ५, २०२१/आश्विन १३, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १९.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), यांजकडून**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ११ (१) अन्वये.—**

क्रमांक उजिभू-मं.अ.-कावि-१७४-२०२१.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम ३ मधील पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसूल व वन विभाग, अधिसूचना क्र. एमआयएस-११-२०१४-सी.आर. ७७-ए-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यानंतर यापुढे याला " सदर्हू अधिसूचना " संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करताना [ सदर्हु कायद्याच्या कलम ३ मधील पोट-कलम (झेड-अ) नुसार ] जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा जास्त नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांना या कायद्याअंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे, त्याअर्थी, अनुसूची-एकमध्ये दर्शविलेल्या जमिनी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त जमीन " असा उल्लेख करण्यात येईल) अनुसूची-दोनमध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यात यापुढे याचा उल्लेख " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांची समुचित शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदर्हु कायद्याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) नुसार सार्वजनिक कामाचे प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते असे अधिसूचित करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, सदर्हु भूमी संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये नमूद केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये नमूद केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, या भूमी संपादन कायद्याचे कलम ४३ पोट-कलम (१) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये प्रशासकाचे विवरण नमूद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसूची-पाचमध्ये माहिती देणे आवश्यक आहे.) ;

त्याअर्थी, सदर्हु कायद्याच्या कलम ११ चे पोट-कलम (४) नुसार अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सदर्हु भूमी कायद्याच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या भूमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणी मधून अशा भूमी मालकास सूट देऊ शकेल :

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतीची जिल्हाधिकारी द्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदर्हु भूमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी , भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यापुढे ज्याचा उल्लेख “ उक्त नियम ” असा करण्यात येईल) चे नियम १०, उपनियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेतील.

त्याअर्थी, समुचित शासन म्हणून जिल्हाधिकारी सदर्हु कायद्याचे कलम ३ पोट-कलम (छ) अन्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ३-अ-६५-२०१९-२०२०, गाव मांगली, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर, प.ह.नं. ८७.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्र. किंवा गट क्र. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ८३ | ० १२ |
| | एकूण संपादनाखालील क्षेत्र . . | ० १२ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव : गोसेखुर्द प्रकल्प.

प्रकल्पाचे कामाचे विवरण : मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेच्या नक्षी शाखा कालव्यावरुन निर्गमित लघु कालवा एल ४, सा. क्र. ४५७५ मी. च्या बांधकामाकरिता भूसंपादन प्रस्ताव.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे : सदर प्रकल्पामुळे चंद्रपूर-भंडारा व नागपूर जिल्ह्यातील अंदाजे १,९०,००० हे. आर जमिनीला सिंचनाचा लाभ मिळेल.

## अनुसूची-तीन

प्रकल्प बाधितांना विस्थापित करणे आवश्यक असल्याबाबतची कारणे

– निरंक –

**अनुसूची-चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :** : पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन मेमोरन्डम क्र. जे-११०१६ (७)-८४-ईएन ५-१अ, दिनांक ३ फेब्रुवारी १९८८ अन्वये या प्रकल्पास पर्यावरण विभागाचे नाहरकत मिळालेले असल्याने नविन भूसंपादन कायदा, २०१३ कलम (६) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. अधिका-याचे नाव, पदनाम : निरंक

ब. अधिका-याचा कार्यालयीन पत्ता : निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे) : निरंक

**विशेष नोंद** : भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

नागपूर :
दिनांक २७ सप्टेंबर २०२१.

(अवाच्य),
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.